डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

परिपत्रक क्र. आस्था/विभाग/ ०३/२०२१

माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतूदीच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या नियुक्ती संबंधी मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये सर्व प्रशासकीय विभाग प्रमुखांना कळविण्यात येते की,

१. सर्व शैक्षणिक/प्रशासकीय विभागात माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त होणाऱ्या अर्जांसाठी जनमाहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येते असते.

२. शैक्षणिक विभाग प्रमुख/प्रशासकीय विभाग प्रमुख यांना जनअपिलीय अधिकारी नेमण्याचे ठरत आहे.

३. शैक्षणिक विभाग प्रमुख/प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आपल्या विभागातील सहाय्यक प्राध्यापकांची महिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी जनमाहिती अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यासाठी नावे कळवावी.

४. प्रशासकीय विभाग प्रमुख/प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आपल्या विभागातील सहाय्यक कुलसचिव/कक्ष अधिकारी यांची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी जनमाहिती अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यासाठी नावे कळवावी.

५. सदरील जनमाहिती अधिकारी यांच्या नियुक्तीची कार्यवाही करण्यासाठी आपल्या विभागातून माहिती अधिकारी नेमण्यासाठी नावे दि. 18-1-21 पर्यंत आस्थापना विभागात कळविण्यात यावी.

६. माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत मागणी करण्यात आलेली माहिती जनमाहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या विषयी असेल तर सदरील अर्जाबाबत इतर सक्षम अधिकाऱ्यांची जनमाहिती/अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येईल.

७. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीच्या अनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या जनमाहिती/अपिलीय अधिकाऱ्यांमध्ये बदली, सेवानिवृत्ती अथवा इतर कामामध्ये बदल झाल्यास त्वरीत कुलसचिव कार्यालयास अवगत करण्यात यावे.

८. सर्व माहिती व अपिलीय अधिकारी यांचे नाव, पदनाम व इतर माहिती असणारा फलक कार्यालयात दर्शनी भागावर लावावा.

कृपया सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

विद्यापीठ प्रांगण,)(
औरंगाबाद- ४३१ ००४)(
संदर्भ :- आस्था/विभाग/२०२०/13088-174)(
दिनांक :- 05-०१-२०२१)(

कुलसचिव

या परिपत्रकाची प्रत माहिती व पुढिल कार्यवाहीस्तव:-

१) संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा उपपरिसर, उस्मानाबाद.
२) सर्व शैक्षणिक विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
३) सर्व प्रशासकीय विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
४) संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
५) जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.